ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 10 | July - 2016

International Online Multidisciplinary Journal
Review of Research
ISSN No : 2249-894X
Impact Factor : 3.1402 (UIF) [2015]
Save Tree, Save Paper, Save World

Review Of Research

# भारतीय संगीतातील निवडक स्त्री गायक कलावंतांचे योगदान : एक अभ्यास

**डॉ. मीनल ठाकरे**
सहयोगी प्राध्यापक , संगीत विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महा., अमरावती (महाराष्ट्र)

**सारांश :**

सर्जनशीलता ही माणसाची सहज प्रवृत्ती आहे. प्रत्येक माणूस हा जन्मत:च ही सृजनप्रवृत्ती सोबत घेवून आलेला असतो. फरक इतकाच कि, ज्याच्याकडे ही सृजनशीलता जास्त असते तो चांगली निर्मिती करू शकतो. मग ती दगडातून, चित्रातून, एखाद्या वाद्यातुन, रांगोळीतून, नृत्यातून वा स्वरयंत्राच्या माध्यमाने गळ्यातून..... अशा विविध निर्मिती स्त्रोतातून कलाकार हा उपजत असतो, घडत असतो. भारतीय संगीतातही अनेक मान्यवर कलाकारांनी आपल्या कलेने इतिहास घडविला आहे. मग ते बिसमिल्लाँ खाँ



साहेब असोत, विष्णुद्वय पं. भातखंडे व पं. पलुस्कर असोत कि सुप्रसिद्ध नृत्यांगना सितारा देवी असोत, या सगळ्या कलाकारांनी भारतीय संगीताची परंपरा समृद्ध बनवली आहे. अशाच काही निवडक स्त्री कलावंतांचे भारतीय संगीताला काय योगदान लाभले, याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे. यात प्रामुख्याने गान सरस्वती किशोरीताई आमोणकर, भारतीय संगीत ग्रामोफोनवर ठसा उमटवणारी कलावंत गौहर जान, भावसंगीतावर आपल्या सुरेल गळ्याने खूप काळ साम्राज्य गाजविणाऱ्या सुमण कल्याणपूर, ठुमरी गायनाला एक नविन आयाम देणाऱ्या शोभा गुर्टू, स्वरगंगा गंगुबाई हनगल, सुगम संगीतातील माणिकमोती सुप्रसिद्ध माणिकताई वर्मा, ख्यालगायकीचे एक वेगळे रूप, बंदिशीचा वेगळा घाट दाखवून श्रेष्ठ गायिका व उत्कृष्ट रचनाकार, बंदिशकार म्हणून लौकिकप्राप्त डॉ. प्रभाताई अत्रे, जयपूर घराण्याच्या ख्यातनाम गायिका व उत्कृष्ट बंदिशकार श्रीमती अश्विनीताई भिडे, या मान्यवर गायक कलावंतांच्या योगदानाबद्दल विचार करणार आहोत.

जयपूर घराण्याला नवे परिमाण मिळवून देणाऱ्या व स्वरामध्ये रममाण होवून आपली बंदिश स्वरार्थात विरघळून टाकणाऱ्या स्वरार्थरमणी गानसरस्वती किशोरीताई ह्यांचे फार मोठे योगदान शास्त्रीय संगीताला लाभलेले आहे. श्रीमती मोगुबाई कुर्डीकर या आपल्या आई कडूनच त्यांनी गायनाची तालीम घेतली. शास्त्रीय संगीतातील आकृतीबंधाचा नेमकेपणा, शिस्तबद्धता व रूक्षपणा कमी करून त्यात स्वराकृतीचा डौलदारपणा, रेखीवपणा व सगळ्यात महत्वाचे म्हणजे ख्याल संगीतातील भावाभिव्यक्ती, भाववाद हे सर्व अभिजातवादापासून भाववादाकडे नेण्यात महत्वाचे योगदान किशोरीताईंचे लाभलेले आहे.

अठराव्या शतकापासून ते आतापर्यंतचे म्हणजे सुरश्री केसरबाई मोगुबाई गात्या होत्या तो पर्यंतचे विसावे शतक म्हणजे स्थूलमानाने अभिजातवादाचे. आणि याच शतकाच्या सरासरी सुरूवातीपासून म्हणजे अब्दुल करीम खाँ, अमीर खाँ, ओंकारनाथ व कुमार गंधर्व पासूनचे पुढचे आजचे बहुतेक सर्व गायक हे भाववादी समजावे.

बंदिशीचा विचार मांडतांना किशोरीताई म्हणतात, प्रेरणा वेगळी आणि भूमिका वेगळी. प्रेरणेतून बंदिशी होतात. राग–भाव–शब्दार्थ, शब्द–नाद, लय–ताल या सर्वांचे एकत्र रसायन होऊन बंदिश सुचते. त्यांच्या संपूर्ण आयुष्यात जी गान तपश्चर्या त्यांनी केली ती चिंतनावस्था जेव्हा लेखनरूपाने बाहेर पडली तेव्हा 'स्वरार्थमणी' सारख्या फार मौल्यवान ग्रंथाची निर्मीती झाली. अनेक मैफिली गाजविलेल्या किशोरीताईंनी प्रत्यक्ष रस–भाव सिद्धांत जो मांडला तो केवळ त्यांना आलेल्या अनुभूतीच्या सहाय्यानेच.

इतर घराण्याच्या गायकीपेक्षा बरीच कठीण असलेली अत्रोली घराण्याची गायकी त्या गात. तरिही जयपूर घराण्यालाच त्या आपले सर्वस्व मानीत. पण तरिही, जयपूर घराण्याला मातृतूल्य मानत असतांनाच एक अभिजातवादी व भाववादी कलाकार म्हणून तसेच स्वर लयीच्या अजोड तत्वाशी तादात्म्य पावणारा एक भावसंपन्न कलाकार म्हणूनच त्या जास्त ख्यातीप्राप्त झाल्यात.

एक कलाकार म्हणून जगभर नावाजलेल्या दुसऱ्या महान गायिका श्रीमती गंगुबाई हनगल, या वास्तवात अतिशय साध्या, प्रेमळ, कुटूंबवत्सल अशा होत्या. जवळ जवळ एक शतकाचं आयुष्य जगतांना, पैशाच्या मोहाला बळी न पडता आपल्या मुळ गावात राहूनच त्यांनी कलेची उपासना केली. शास्त्रीय संगीत गायकीत महिलांचा प्रवेश झाल्यानंतर इ.स. 1930 ते 1940 च्या दशकात हिराबाई बडोदेकर, केसरबाई केरकर अशा नावारूपाला आलेल्या गायिकांबरोबर उदयोन्मुख गायिका म्हणून एक नाव पुढे येत होतं. ते म्हणजे 'गंगुबाई हनगल' यांचे.

कर्नाटक व महाराष्ट्राच्या सीमा रेषेवर वसलेल्या 'हुबळी' या गावात पहिल्या महिला गायिका म्हणून त्यांचे नाव पुढे आलं आणि पुरूष गायकांच्या बरोबरीनं त्यांना प्रसिद्धी मिळाली. हे खरं होतंच की त्यांच्या सारख्या कलाकाराला हुबळी–धारवाडला जास्त वाव नव्हता. त्यांचे बहुतांश कार्यक्रम मुंबई–पुण्यात आणि उत्तर भारतात व्हायचे.

पं. सवाई गंधर्व उर्फ रामभाऊ कुंदगोळकर ह्यांच्या त्या शिष्या होत्या. गंगुबाईचे पहिले गुरू श्री. कृष्णाचार्य हुलगुरू हे होते. सवाई गंधर्वांच्या सुरांचा परिस स्पर्श गंगुबाईंच्या सुरांना झाला आणि 'गं' धार तीव्र झाला. सुरश्री केसरबाई, मोंगुबाई कुर्डीकर, लक्ष्मीबाई जाधव, मेनकाबाई शिरोडकर, रसलून बाई, बेगम अख्तर या साऱ्या स्त्री कलाकारांना गंगुबाईंनी जवळून पाहिले.

गंगुंबाईंवर वृत्तचित्र बनवणाऱ्या श्रीमती विजया मुळे म्हणतात, 'वर वर पाहता गंगुबाईंचं वागणं एखाद्या गृहिणी सारखंच वाटतं, पण एकदा का त्या गायल्या बसल्या की, त्यांचं व्यक्तिमत्व संपूर्णपणे बदलून जातं. त्यांच्या मृदु आवाजात एक धीरगंभीर अशी खोली निर्माण होते. मग त्यांचे मित्रवर्ग त्यांना थट्टेने 'गंगाबुवा' म्हणतात. व्यासपीठावर बसणं सुद्धा इतर महिलांसारखं नसतं, हातात तंबोरा नसतो, कुठली तरी संकीर्ण, कलात्मक स्वरावली गातांना डावा हात कानावर असतो. त्यांच्या बदानी जलभूमीच्या अचल खडकांसमान त्यांच्या गाण्यात एक गांभीर्य आणि शक्ती जाणवते.

त्यांना मिळालेल्या प्रमुख पुरस्कारांमध्ये अतिशय सन्मानाचा असा पद्मविभूषण हा पुरस्कार होय. भारत सरकारच्या वतीने दि. 27.10.2002 रोजी तत्कालीन विद्यमान राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते प्राप्त झाला. सेंट्रल संगीत नाटक अॅकेडमी पुरस्कार, आकाशवाणीत पन्नास वर्ष पूर्ण झाल्याबद्दल तत्कालीन मा. प्रधानमंत्री मोरारजी देसाई यांच्या हस्ते झालेला सन्मान, आय.टी.सी. संगीत अॅकेडमी पुरस्कार, दीनानाथ मंगेशकर पुरस्कार, असे 50 च्या वर पुरस्कार व सन्मान त्यांना प्राप्त झालेले आहेत.

त्यांच्या आयुष्यातल्या सगळ्या दु:ख, वेदनांचा निचराही संगीतानेच केलेला आहे. आणि ज्या समाजाने 'गाणारिण' म्हणून त्यांची अवहेलना केली त्याच समाजाने त्यांना 'गानसरस्वती' म्हणून मान्यता दिली. मृत्यूनंतर त्यांनी नेत्रदान केलं आणि समाजाला एक दृष्टी दिली. मातृऋण, गुरूऋण आणि समाजऋण या साऱ्यातुन त्या खऱ्या अर्थाने मुक्त झाल्या आहेत.

शास्त्रीय संगीतात राग गायनामध्ये खूप महत्वाची अशी बंदीश, बंदिशीचे स्वरूप, तिचा मुखडा, त्यात होणारी रागाची ओळख, रागसादरीकरणातील बंदिशीचे महत्व, अशा अनेक महत्वाच्या बाबींवर सविस्तर प्रकाश टाकला आहे स्वरमयी डॉ. प्रभा अत्रे या महान गायीकेने, व सुप्रसिद्ध बंदिशकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रथितयश कलाकाराने. त्या स्वत: एक उत्तम गायिका असल्यामुळे मैफिली मध्ये गाणं व श्रोत्यांची दाद घेणं म्हणजे नेमके काय ? याचे अचूक विचारमंथन त्यांच्या अनुभवातून त्यांनी केलेले आहे. आपल्या 'स्वरमयी' व 'सुस्वरावली' या पुस्तकातून ते खूप चांगल्या पद्धतीने व्यक्तही केले आहे. त्या म्हणतात, 'मैफिली चे संगीत हे कलाकार आणि श्रोता यांच्या संवाद तत्वातून तयार होतं, मैफिलीमध्ये श्रोताही अप्रत्यक्षपणे निर्मितीत भाग घेत असतो. स्वत:ला काय आवडतं, ते तर गायक गातोच पण श्रोत्यांना काय आवडतं, याचंही भान गायकाला असलं पाहीजे, मैफिल ही अशाच विचारातून, चिंतनातून व अभ्यासातून आकारते, असे त्या म्हणतात.' सुरूवातीला शब्द आणि भाव यांच्या पांगुडगाळ्यात बसून हा कलाप्रवास सुरू झालेला असला तरी शेवटी आनंद असतो, तो फक्त सूर आणि लयीचा, मैफिलीचे यश या आनंदयात्रेत किती श्रोते सहभागी झाले, यावर मी मोजते, असे त्या म्हणतात. त्यांच्या मते सांगीतिक कलाकृती तयार होतांना प्रामुख्याने आवाज, रागस्वरूप, मुख्य बंदिश, लयीचा डौल, रागमांडणी, बैठकीत गायल्या गेलेले संगीताचे इतर प्रकार व मैफिलीचा आकार या सर्व गोष्टींचा विचार केल्या जात असतो.

संगीत हे विविध कलाकारांच्या विविध अभिव्यक्तितून बाहेर पडत असते. प्रत्येक वेळी ते कुठल्या गोष्टीने श्रेष्ठ ठरेल हे निश्चित नाही करता येत. शेवटी, बोलउपज श्रेष्ठ की सरगम श्रेष्ठ, ख्याल श्रेष्ठ, अमकं घराणं मोठं की तमकं घराणं मोठं हा वादाचा मुद्दा होऊ नये, जे पेश होतंय, ते कसं होतंय, त्या पाठीमागे विचार आहे की नाही, त्यापासून रसनिष्पत्ती, आनंदनिर्मिती होते की नाही, हे महत्वाचं.

प्रभाताईंनी चमत्कृतीपूर्ण व रागसौंदर्य टिपणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण अशा बंदिशींची रचना केलेली आहे. आणि त्यामुळेच त्या हे सर्व बोलण्याचे व लिहीण्याचे धाडस करू शकतात. त्या म्हणतात, ज्या माध्यमातून कला आपल्यापर्यंत पोहोचते, ते माध्यमच सदोष असेल तर ती कलाही सदोष वाटू लागते. म्हणूनच कोणतीही गोष्ट चांगली किंवा वाईट, हे एकदम ठरवता कामा नये. आणि त्यासाठीच संगीत सतत जाणिवेनं ऐकत राहण्याची, त्याबरोबरच थोड्या शिक्षणाची आणि चिंतनाची जरूरी आहे.

प्रभाताईंच्या जीवनात अपघाताने प्रविष्ठ झालेलं संगीत हे त्यांच्याच जीवनाचं एक अविभाज्य अंग केव्हा बनलं हे कळलं देखिल नाही. साधने बाबत बोलतांना त्या म्हणतात,

सुरांची साधना,
पाण्यावर ओढलेल्या रेषेसारखी,
उमटत असताच,
मिटून जाणारी.

कोणत्याही संगीताची सामग्री सूर आणि लय हीच असते. सूर आणि लय यांच्या विशिष्ट संयोगातून आविष्कारातून, संगीतातील आकृतीबंध तयार होत असतात. त्यातले काही घाट आपल्याला जवळचे वाटतात, तर काही वाटत नाही. याची कारणं कोणती, ती शोधण्याचा आपण प्रयत्नच करीत नाही. अशा प्रकारची वैज्ञानिक दृष्टी ठेवून त्यांनी संगीताचा अविरत अभ्यास केलेला आहे. आणि करीतही आहे.

प्रत्येक काळामध्ये असे मोठमोठे कलाकार होऊन गेले, ज्यांची स्वत:ची अशी प्रवासाची खासियत होती. अशाच एक आपला काळ गाजवणाऱ्या आणखी एक स्त्री कलावंत म्हणजे ‘गौहरजान’ होत. कला आणि संस्कृतीचं तत्कालीन केंद्र असलेल्या वाराणसीत त्यांनी बाईजी म्हणून तालीम घेतली आणि कलांचे माहेरघर असणाऱ्या कलकत्यात नाम कमावलं.

संगीताच्या क्षेत्रामध्ये ग्रामोफोन ध्वनीमुद्रिकांचा शोध हा मोठा टप्पा होता. त्याचवेळी गौहरजान प्रकाशझोतात आल्यात. संगीतातील नजाकत, बारकावे आणि त्याची शुद्धता हे यंत्र कशाप्रकारे पुन:प्रस्तुत करणार या बद्दल संगीत क्षेत्रातल्या तत्कालीन दिग्गजांच्या मनात फारच आशंका होती.

त्या काळात, ग्रामोफोनचं महत्व जाणून घेऊन मोठ्या प्रमाणावर ध्वनीमुद्रिका केल्या. त्यांची ठुमरीवर खूप पकड होती. त्यांनी अनेक घराण्याची तालीम घेतली. संशोधकांच्या दृष्टीने स्त्री कलाकारांच्या आयुष्याबद्दलच्या माहितीचा तुटवडा हा गंभीर प्रश्न आहे. जी एकेकाळी प्रख्यात होती, जिची छबी ऑस्ट्रिया मध्ये उत्पादित होणाऱ्या आगपेट्यांवर आणि पोस्टकार्डावर छापली गेली होती, ध्वनीमुद्रिकांवर मुद्रित होणारा जिचा पहिला आवाज होता, अशी गौहरजान आज हिंदुस्थानी कलाकारांच्या सुद्धा जवळपास विस्मरणात गेलेली आहे. परंतु जुन्या ध्वनीमुद्रिकांचा संचय करणारे आणि काही जुने दर्दी त्यांच्या कलेची महत्ता जाणून आहेत.

त्यांनी गायलेलं खूप नावाजलेलं गाणं म्हणजे ....

अय् मोहब्बत तेरे अंजाम पे रोना आया,
जाने क्यूँ आज तेरे नाम पे रोना आया।।

मोकळ्या गळ्यानं ठुमरी गाण्याची स्वत:ची शैली विकसित करणारी म्हणून गौहर जान ह्यांची आई मल्का जान या पण खूप लोकप्रिय होत्या. धृपद, खयाल, ठुमरीपासून हल्कीफुल्की लोकगीतं ते होरी, चैती, कजरी, टप्पा आणि गझलगायकी पर्यंत त्यांची गाण्यावर पकड होती. कलकत्तातील विख्यात गायिका, नर्तकी आणि ग्रामोफोनमुळे जिचं नांव सर्वतोमुखी झालं त्या गौहरजानच्या मृत्यूच्या बातमीला देशभरातल्या वृत्तपत्रांनी मोठी प्रसिद्धी दिली. कलकत्याच्या ‘स्टेटसमन’ या दैनिकाने आपल्या मंगळवार दि. 29 जानेवारी 1930 च्या अंकात ‘स्टेज अॅन्ड स्क्रीन’ या स्तंभात लिहिलं :

म्हैसूरच्या महाराजांच्या दरबारातील गायिका व नर्तकी गौहर जान हिच्या म्हैसूरमध्ये झालेल्या मृत्यूमुळे संगीतक्षेत्राची खूप मोठी हानी झाली आहे. मूळ युरोपिअन वंशाची असलेल्या गौहरचं आधीचं नाव एलीन अँजेलीना येवर्ड होते. 1873 मध्ये जन्मलेल्या एलीननं वयाच्या 6 व्या वर्षी आई बरोबर इस्लाम धर्माचा स्वीकार केला, तेव्हा आईनं मल्का जान हे नाव धारण केलं तर एलीन चं नाव गौहर जान असं झालं. गायिका म्हणून तिने मिळविलेल्या प्रसिद्धीमुळे भारताची ‘गानकोकिळा’ गणली जाऊ लागली, आणि म्हणूनच हिंदुस्थानी गाण्याच्या ध्वनीमुद्रणाचा निर्णय पहिल्यांदा झाला, तेव्हा प्रथम त्यांचेच नाव पुढे आले. अशाप्रकारे गौहर जान ही सौंदर्य आणि संगीताचं वरदान लाभलेली फारमोठी गायीका संगीत जगतात होवून गेली व आपल्या प्रतिभेची छाप ग्रामोफोन ध्वनीमुद्रिकांच्या मार्फत ठेवून गेली.

‘अमृताहुनी गोड’ असे आवाजाचे देणे लाभलेल्या आणखी एक सुप्रसिद्ध भावसंगीत गायीका म्हणजे श्रीमती माणिक वर्मा होत. हिराबाई दादरकरर ह्यांच्या कन्या. मधुर, सुरेल, हलका आववा, सर्व संगीत प्रकारांना न्याय देण्याची आश्चर्यकारक क्षमता. ध्वनिमुद्रिका, आकाशवाणी, बोलपट व मैफली इ. सर्व माध्यमांतील त्यांचे संगीत सर्वांना भावणारे असे. किराणा घराण्याची तालीम त्यांना मिळालेली होती. ठुमरी, नाट्यगीत व भावगीत या तिनही प्रकारांत माणिकताईंचा मुक्त वावर असायचा.

एक काळ असा होता की ख्यालियांनी ख्याल गावा, ठुमरी गाऊ नये, ठुमरी गाणाऱ्यांनी गझल-कव्वाली गाणाऱ्यांकडे तुच्छतेने पहावे, गवयाने नाट्यसंगीत- भावगीत इ. कडे अधिक्षेपाने बघावे, एकेका कलाकाराने एकेका शाखेत वा प्रकारात प्राविण्य मिळवावे. सगळे गाण्याच्या भरात सर्वच अधकच्चे गाऊ नये, एवढीच भावना या अलिखित नियमांमागे असती तर हरकत नव्हती, पण ई परीस्थिती तशी नाही आहे. त्यांच्या आवाजातील नैसर्गिक मोकळेपणा, हल्केपणा व लगावातील सहजता लक्षात ठेवण्यासारखी आहे.

माणिकताईंची तानक्रिया किराण्याच्या परंपरेपासून बरीच पलीकडे गेलेली होती. आलापातला निर्मळ ‘आ’ कार तानेतही विरूप होत नाही व ते अगदी सहजतेने आलेले आहे असाच प्रत्यय येई. आरोही अवरोही कोणतेही चलन असले तरी त्यांचे जाणे-येणे नेहमी सफाईदार राही. त्यांच्या गायनात भरलेली सहजता तानातही आढळायची. स्वरांमुळे वाहून न जाता व तानेबरोबर न भरकटता त्या एक संयत आविष्कार उभा करत. विविध प्रकार नेटकेपणे व क्षमतेने गाणारी कलावती म्हणून आज अग्रभागी असलेली कलावती म्हणून सौ. माणिक वर्मा यांचे उदाहरण नि:संशय घेता येईल.

भावसंगीतातील हिरवा चाफा म्हणून ज्यांना संबोधल्या जाते, अशा जेष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर म्हणजे आपल्या स्वरसुगंधाचा घमघमाट सर्वत्र पसरविणाऱ्या भावसंगीतातील भावसुंदर चेहऱ्याच्या फार मोठ्या धनी म्हणाव्या लागतील. त्यांनी गायलेली अवीट गोडीची अनेक हिंदी, मराठी गीतं वेगवेगळ्या माध्यमांतून आपल्या कानी पडत असतात. पण ज्या पार्श्वगायिकेने आपल्या गोड गळ्याने बावन्न-त्रेपन्न सालापासून थेट ऐंशीच्या दशकापर्यंत एक जमाना गाजवला, केवळ हिंदी-मराठीच नव्हे, तर गुजराती, गुरूमुखी, पंजाबी, बंगाली, आसामी, उडिया, उर्दू, भोजपुरी, छत्तीसगढी, कानडी, ब्रज अशा एकूण तेरा भाषांमधील गीतं आपल्या मधुर शैलीत सहज गाऊन लोकप्रिय केली, त्या गायिकेचं दर्शन जाहीर व्यासपीठावरून, सत्कार सोहळ्यांमधून जवळजवळ घडतच नाही. या गुणी जेष्ठ गायिकेने हा अज्ञातवास अवेळी स्विकारला, याची चुटपुट लागून राहते.

गोड अलवार गळा, शब्दातील ऱ्हस्व-दिर्घ आणि मात्रांचे नेमकं भान ठेऊन उच्चारण करण्याची सुघट शैली, भक्तिभाव, संस्कार, भावना जागविणारं सहज गायन आणि त्यात रंगून जाण्याचा स्वभाव यामुळे ऐकणाऱ्या रसिकांच्या मनावर सुमनताईंच्या गाण्यांचा प्रचंड पगडा आहे.

पुनरागमनानंतर सुमनताईंच्या प्रकाशित झालेल्या ध्वनिफितींपैकी एका महत्वाच्या ध्वनिफितीबद्दल आवर्जून सांगावेसे वाटते. पं. गोविंदप्रसाद जयपूरवाले आणि भवदीप जयपूरवाले यांनी संगीत दिलेले ही भजने अत्यंत श्रवणीय आहेत. सुमनताईंनी गायलेल्या उत्कृष्ठ उर्दू गझलांची संख्या ही मोठी आहे. त्यांच्या चित्रपटगीतांतून ठुमरी, झुला, सावन, होरी, असे सर्वच उपशास्त्रीय गीतप्रकार ऐकायला मिळतात. आणि म्हणूनच एक गायनातील अष्टपैलू हीच त्यांची खरी ओळख म्हणता येईल.

एका जमान्यात सिद्धेश्वरीदेवी, रसूलनबाई यांची नावे ठुमरी म्हटली की डोळ्यापुढे येत. शास्त्रीय गायनाची गंगोत्री जसे ग्वाल्हेर तसं ठुमरी चे उगमस्थान आहे बनारस. अजूनही गिरीजादेवी बनारस ढंगाची शान राखून आहेत. या पूरब (बनारस) घराण्याऐवढीच प्रतिष्ठा आहे दिल्ली घराण्याची. बेगम अख्तर फैजाबादी या तर ठुमरीच्या अनभिषिक्त सम्राज्ञी म्हणून ओळखल्या जातात. निर्मला अरूण याही एक आघाडीच्या ठुमरी गायिका म्हणता येईल. पण ज्यांनी ठुमरी गायकीत फड जिंकून नेला त्या आहेत शोभा गुर्टू.

शोभाताईंच्या रक्तातूनच संगीत वाहत आहे. त्यांची आई श्रीमती मेनका शिरोडकर एकेकाळच्या विख्यात गायिका. अत्रोली घराण्याचे नत्थन खाँ यांच्याकडे त्यांनी दीर्घकाळ तालीम घेतली. ठुमरी, गझल, कव्वाली, कजरी, होरी, दादरा, टप्पा वगैरे प्रकार त्यांनी धमणखाँ (ग्वाल्हेर) यांच्याकडून अवगत केले. अशा तीन घराण्यांच्या गायकीतून त्यांनी आपली एक स्वत:ची भावपूर्ण, नादमधूर अशी शैली तयार केली आहे. पूरब ढंगाएवढीच त्यांची दिल्ली घराण्यावरही हुकुमत आहे. पंजाबी ढंगाचाही त्यांनी चांगला अभ्यास केलेला आहे. शास्त्रीय संगीताच्या भक्कम पायावर उभी असलेली त्यांची ठुमरी त्यांच्या अंगी उपजत आणि मेहेनतिनं कमावलेल्या भावुक कामगतीनं फुलते, बहररते. म्हणूनच शोभा गुर्टू ह्यांचे गाणं अंत:करणाचा ठाव घेतं व त्यांचे वेगळेपण जपतं. उपशास्त्रीय गीतप्रकारांबरोबरच त्यांची भजनं देखील लोकगीतातून प्रसवलेली असल्या कारणाने मनाचा वेध घेणारी ठरतात.

अभिजात शास्त्रीय संगीतातील 'बंदिश' या राग गायनातील महत्वाच्या गानप्रकारावर ज्या काही मान्यवर बंदिशकारांनी आपले विचार मांडलेले आहेत, त्यात महत्वपूर्ण असे अलिकडे खूप नावाजलेले नाव म्हणजे डॉ. अश्विनी भिडे होत. रागस्वरूपाची दिशा ठरवून बंदिशीच्या माध्यमातून ती मार्गक्रमण करीत असते असे त्या म्हणतात. रागाचा नक्शा म्हणजे अंदिश होय. कलाकार व श्रोत्याला विविध सौंदर्य स्थळांच्या हिंदोळ्यावर झुलवणारी ही बंदिश जेव्हा स्वर व लयीच्या माध्यमातून विविध पातळीवर प्रविष्ठ होते तेव्हा बंदिशकाराच्या डोक्यातुन प्रकटलेली बंदिश ही कलाकाराच्या गळ्यातून साकार होतांना कदाचित आपली जागा सोडतही असेल, पण तरीही मनमुराद आनंद देणारी ठरते हे मात्र नक्की. श्रीमती माणिकताई भिडे ह्यांची कन्या असलेल्या अश्विनीताईंना सर्वप्रथम तालीम ही आई कडूनच प्राप्त झाली. जयपूर घराण्याची परंपरा लाभलेल्या त्यांच्या गायकीत महत्वपूर्ण काय असे तर ती 'बंदिश' होय.

बंदिशीतील बांधण्याची क्रिया, तिचा आकृती बंध, गीताचे बोल किंवा शब्द, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे रागवाचक स्वरसमुह किंवा स्वरावली, ज्यातून बंदिश ही खऱ्या अर्थाने दाद घेवून जाते, या सर्व गोष्टी त्यांच्या बंदिशीतून प्रकर्षाने जाणवतात.

ख्यालाद्वारे रागाला व्यक्त करण्याचा सोपान म्हणजे बंदिश होय. म्हणूनच 'बंदिश' हे एक असे तत्व आहे, कि ज्यातून रागप्रस्तुतिकरण करणाऱ्या विभिन्न घटकांचा समन्वय साधून कलाकार श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेवू शकतो. आपल्या 'रागरचनांजलि भाग 1 व 2' या बंदिशींच्या पुस्तकाद्वारे व सोबतच सी.डी. च्या माध्यमातून अनेक कलावंत व विद्यार्थ्यांकरीता अश्विनीताई मार्गदर्शक ठरलेल्या आहेत.

### निष्कर्ष :-

अशाप्रकारे घरंदाज गायकी गाणारे कलावंत असो वा ग्रामोफोन द्वारे संगीताच्या माध्यमातून अनेकांना भुरळ पाडणारे कलाकार असोत, ते शास्त्रीय संगीत असो वा भावसंगीत...., एकुण 12 स्वरांनी (शुद्ध व विकृत) व्याप्त असे हे संगीत निश्चितच समृद्ध बनविण्याचे काम या स्त्री कलावंत गायिकांनी खूप निष्ठेने केले व भारतीय संगीताला एक वेगळ्या उंचीवर नेऊन पोहोचविले हे निर्विवाद सत्य आपल्याला स्विकारावेच लागेल, यात शंका नाही.

### संदर्भ :-

१. 'गंगावतरण' दमयंती नरेगल, अनुवाद- सुनंदा मराठे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
२. 'स्वरगंगा- गंगुबाई हनगल' संध्या देशपांडे, अनुबंध प्रकाशन, पुणे.
३. 'स्वरमयी' डॉ. प्रभा अत्रे, बुकमार्क पब्लिकेशन्स, पुणे.
४. 'सुस्वराली' डॉ. प्रभा अत्रे, बुकमार्क पब्लिकेशन्स, पुणे.
५. 'गौहरजान म्हणतात मला' विक्रम संपत, अनुवाद- सुजाता देशमुख, राजहंस प्रकाशन, पुणे.
६. 'मला भावलेले संगीतकार' डॉ. अशोक रानडे, राजहंस प्रकाशन, पुणे.
७. 'संगीतातील माणिकमोती' वा. वा. गोखले, रोहन प्रकाशन, पुणे.
८. 'सुमनसुगंध' मंगला खाडिलकर, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.
९. 'रागरचनांजलि भाग 1 व 2' अश्विनी भिडे-देशपांडे, राजहंस प्रकाशन, पुणे .